# महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड

## चौथे गिरिमित्र संमेलन  ३ जुलै २००५

## मध्यवर्ती संकल्पना - महाराष्ट्राच्या गिर्यारोहणाची ५० वर्षे

उत्क्रांतीच्या एका टप्यावर माणुस पृथ्वीवर अवतरला आणि तेव्हापासुनच माणसाचं आणि साहसाचं नातं जुळत गेलं. अज्ञाताच्या शोधाची जिज्ञासा माणसाला कधीच स्वस्थ बसु देत नाही. यातुनच तो निरनिराळे धाडसाचे प्रयोग करतो, या प्रयोगातुनच कधी मग 'किनारा तुला पामराला' असं गर्वानं सागराला सांगत कोलंबस नव्या प्रदेशाच्या शोधास निघतो, तर छोट्याश्या विमानातून न थांबता पृथ्वीप्रदक्षिणेचा संकल्प काही महाभाग पुरा करतात.

सुरवातीपासुनच डोंगर माणसाचे सखेसोबती झाले आहेत. या शिखराच्या माथ्यावरती, त्या धारेच्या पलिकडे काय असेल बरं हा विचार माणसाच्या मनात येत राहीला आणि त्या शोधाखातर तो एक-एक डोंगरदऱ्या पार करत गेला. या जिज्ञासेचं रुपांतर साहसी खेळात व्हायला मात्र बराच काळ जावा लागला. १५ व्या शतकाच्या उत्तरार्धात डोंगरवेड्यांची सुरु झालेली ही धडपड १९ व्या शतकात पोहचली ती नगाधिराज हिमालयापर्यंत. अडीच हजार किलोमीटोरपेक्षाही लांब आणि ७०० किलोमीटरपेक्षा रुंद अशा पसरलेल्या पृथ्वीवरच्या या नैसर्गिक आश्चर्यानं गिर्यारोहकाचं मन आकर्षुन घेतलं. आणि यातुनच जगाच्या सर्वोच्च शिखराच्या शोधाचे प्रयत्न सुरु झाले.

१८५६ सालो सर्व्हे ऑफ इंडीयाने एव्हरेस्ट ऊर्फ चोमोलुंगा अथवा सगरमाथा या शिखराची उंची ८८४८ मीटर आहे हे निश्चित केले. तेव्हापासूनच त्यावर चढाईचे प्रयत्न सुरु झाले. अनेक गिर्यारोहकांच्या प्रयत्नाला दाद न देता अजिंक्य राहीलेलं हे शिखर सर झालं ते १९५३ च्या मे महीन्यातील कर्नल जॉन हंट यांच्या नेतृत्वाखाली मोहिमेत. एडमंड हिलरी आणि भारतीय शेर्पा तेनसिंग नोर्गे यांनी एव्हरेस्टवर प्रथम आरोहण केले.

हया यशस्वी शिखर प्रयत्नाची मोहिनी संपूर्ण भारतभर इतक्या झपाट्यानं पसरली की त्यातुनच दार्जिलिंग इथे 'हिमालयीन माउंटेनिअरिंग इन्स्टिट्युट' या गिर्यारोहणातील शास्त्रशुध्द प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेचा उदय झाला. मेजर नंदु जयाल आणि शेर्पा तेनसिंग यांच्या प्रयत्नांना भरभक्कम साथ होती ती पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या वरदहस्ताची. शास्त्रशुध्द प्रशिक्षण मिळण्याची सोय झाल्यानंतर गिर्यारोहणाचे हे वेड भारतभर अधिक झपाट्यानं पसरु लागलं. महाराष्ट्र आणि बंगाल या राज्यांमधे या खेळानं चांगलंच बाळसं धरलं.

सह्याद्रीची अतिप्राचिन डोंगररांग महाराष्ट्राचा मेरुदंड म्हणून ओळखली जाते. दक्षिणोत्तर साडेसहाशे किलोमीटर पसरलेली ही डोंगर रांग अग्निजन्य खडकापासुन बनली आहे. निर्मितीच्या ओघात तिने नानाविध मनोहारी आकार धारण केले आहेत. या डोंगराचा आणि इथल्या लोकजीवनाचा अतुट संबंध आहे. महाराष्ट्राचे आदीम रहीवासी कातकरी, वारली किंवा भिल्ल असोत किंवा प्राचिन काळापासुन ८४ बंदरांत उतरलेला माल घाटमाथ्यावरच्या बाजारांपर्यंत पोहचवणारे लमाणांचे तांडे असोत, सह्याद्री नेहमीच या सर्वांचा पाठीराखा राहिला आहे. आपल्या कडेखांद्यांवर नाणेघाट, बोरघाट यासारखे अनेक घाट बाळगणारा, जवळपास अडीचशे डोंगरी किल्ले आणि पाचशेहून अधिक लेण्यांनी नटलेला सह्याद्री पूर्वीपासुनच गिर्यारोहकांना खुणावत राहिलाय. या सह्याद्रीनेच पाठबळ पुरवलं ते शिवाजी महाराजांच्या गनिमी काव्याला बाजीप्रभुंच्या पावनखिंडीतील बलिदानाला आणि तानाजीच्या सिंहगडाच्या कड्यावर आरोहण करून केलेल्या विजयी लढाईला.

लोकमान्य टिळकांसारख्या जाज्वल्य देशभक्तालाही शिवछत्रपतींच्या या किल्ल्यांच्या तेजस्वी इतिहासानं आकर्षुन घेतलं. आणि मग छत्रपतींच्या समाधीच्या जीर्णोध्दाराच्या निमित्तानं सिंहगड, राजगड, तोरणा आणि

रायगड अशी भ्रमंती टिळकांच्या पाठिंब्यानं १८९५ इतक्या जुन्या काळी यशस्वीरीत्या पार पडली. अर्थात गिर्यारोहण या प्रकाराला तेव्हा एक क्रीडा प्रकार म्हणून कोणी ओळखत नव्हतं. केवळ हौस किंवा भटकंती म्हणून सुदूर बागलाणाच्या डोंगररांगा तुडवायला एका तरुणानं १९४०च्या सुमाराला सुरुवात केली, त्या तरुणाचं नाव होतं डॉ. जी. आर. उर्फ बापुकाका पटवर्धन. सह्याद्रीतल्या ट्रेकिंगची सुरुवात तेव्हाच झाली असं म्हणायला हरकत नाही. याच सुमाराला मुंबईतील काहीजणांनी 'पारशी पायोनियर्स' ह्या नावानं पदभ्रमण मोहिमांची सुरुवात केली. १९५३ च्या एव्हरेस्ट मोहिमेच्या यशाची ख्याती सर्व भारतभर पसरली तसे मुंबईतले काही तरुण, प्रभाकर पाटणकर, नवनीत पारिख, गांधी बंधु आणि गायतोंडे हे पाचजणं थेट एव्हरेस्टचं जवळुन दर्शन घेण्याच्या जिद्दीनं मुंबईतुन निघाले. १९५४ ला त्यांनी एव्हरेस्टच्या पायथ्यापर्यंतच नव्हे तर त्याच्या अगदी जवळ असलेल्या 'काला पत्थर' या शिखराच्या माथ्यापर्यंत मजल मारली आणि पर्वतराज एव्हरेस्टचं जवळुन दर्शन घेतलं. त्याच सुमारास मुंबईतले एक सॉलिसिटर के. के. बनशा यांनी हिमालयातील गिर्यारोहणाची शास्त्रशुध्द सुरुवात केली. भारतातून त्याकाळी गेलेल्या सर्व महत्त्वाच्या मोहिमांमधे बनशा यांच्या सहभाग होता. १९५८ सालच्या 'चो-यु' /e जगातल्या आठव्या क्रमांकाच्या शिखरमोहिमेचे ते नेते होते. तर १९६० साली भारतीयांतर्फे एव्हरेस्टवर आरोहणाचा जो प्रथम प्रयत्न केला गेला त्या मोहिमेचे ते उपनेते होते. या मोहिमांकरता एक 'पिक स्पॉन्सरिंग कमिटी' स्थापन झाली, तिचचं रुपांतर पुढे 'इंडियन माऊंटेनियरिंग फाऊंडेशन' म्हणजेच आय.एम.एफ. या भारतातील गिर्यारोहकांच्या प्रमुख संस्थेत झालं.

गिर्यारोहणाचे असे तुरळक उपक्रम चालु असतांना संस्थात्मक पातळीवर ही चळवळ सुरु करण्याची गरज मुंबईतल्या काही तरुणांना वाटायला लागली आणि त्यातूनच १९५४ साली 'इंटर कॉलेजिएट हायकर्स क्लब'ची स्थापना केली गेली. प्रोफेसर कामत, प्रो. माळी, प्रो. चांदेकर, प्रो.टिळक, प्रो. मांजरेकर, शरद ओवळेकर, रमेश देसाई, पालकर, दिवाणचंद अरोरा आणि दिवाण यांसारख्या उत्साही मंडळींनी या क्लबची स्थापना केली. त्यातुनच महाराष्ट्रात संस्थात्मक पातळीवरील गिर्यारोहणाची मुहुर्तमेढ रोवली गेली. महाराष्ट्रातील आणि विशेषतः महाविद्यालयिन तरुणांना डोंगरदऱ्यातील भटकंतीला उद्युक्त करणं हा 'इंटर कॉलेजिएट हायकर्स क्लब' स्थापनेमागचा प्रमुख उद्देश होता.

१९५९ पर्यंत प्रस्तरारोहणाचं शास्त्रशुध्द प्रशिक्षण मिळण्याची सोय महाराष्ट्रात उपलब्ध नव्हती. मग त्याकरता 'हिमालयन क्लब'च्या मुंबईतील १४ सदस्यांनी जगदीश नानावटी यांच्या पुढाकारानं 'माउंटेनियर्स कोर्स स्पॉन्सरिंग कमिटी'ची स्थापना केली. या समितीमार्फत 'हिमालयन इन्स्टिट्यूट ऑफ माऊंटेनियरिंग' इथले नवांग गोंबु, आंग कामी अशांसारखे अनुभवी शेर्पा प्रशिक्षक मुंबईत येऊन इथल्या तरुण-तरुणींना प्रस्तरारोहणाचे शास्त्रशुध्द प्रशिक्षण देऊ लागले. मुंब्रा डोंगराच्या परिसरात जवळजवळ दशकभर हा उपक्रम चालू होता. मामा भांजा, कान्हेरी, मलंगगड यासारख्या ठिकाणी प्रस्तरारोहणाच्या कक्षा रुंदावु लागल्या. कर्नाळयाच्या सुळक्यावर हे तरुण प्रस्तरारोहणाचं आपलं कसब आजमावु लागले.

'इंटर कॉलेजिएट हायकर्स क्लब'ला १९६२ साली मुंबई विद्यापीठाची मान्यता मिळाली आणि ' युनिव्हर्सिटी हायकर्स आणि माऊंटेनियर्स सोसायटी' ची स्थापना झाली. या सोसायटीमार्फत मुंबई विद्यापीठासारख्या एका भक्कम संस्थेचं पाठबळ गिर्यारोहणाला लाभलं आणि मग गिर्यारोहणाला उपयुक्त अशा अनेक पुस्तिका आणि नकाशे शास्त्रशुध्द स्वरुपात प्रसिद्ध होऊ लागले. एव्हाना गिर्यारोहकांची पहिली पिढी महाविद्यालयातून बाहेर पडली होती. मात्र महाविद्यालयीन जीवनात लागलेली डोंगराची चटक त्यांना रोजच्या जीवनातही स्वस्थ बसू देत नव्हती. मग त्यातुनच 'गिरिविहार' या संस्थेची स्थापना करण्यात आली. गिरिविहारतर्फे गिर्यारोहणाचा हा उपक्रम समाजातील सर्व स्तरातील लोकांसाठी मोठ्या प्रमाणावर आयोजित होऊ लागला. सर्व वयोगटातील उत्साही व्यक्तिसाठी निरनिराळे गिरिभ्रमणाचे प्रस्तरारोहणाचे कार्यक्रम पार पडु लागले.

पुण्याच्या आघाडीवर जी. आर. पटवर्धन उर्फ बापुकाका पटवर्धन त्यांच्या शैलीत भटकंती करतच होते. त्याबरोबरच सिंहगडावर प्रस्तरारोहणाच्या वेगवेगळया तंत्रांचा आणि संधीचा शोध घेण्याचं त्यांचे कार्य महत्त्वाचं होते. सह्याद्रीतील पदभ्रणाच्या आणि प्रस्तरारोहणाच्या माध्यमातुन हिमालयातील प्रगत गिर्यारोहणाकडे वाटचाल करण्याचे त्यांचं ध्येय होतं.
अर्थात सह्याद्रीतल्या गिर्यारोहणाला जसं साहसाचं कोंदण होतं तसा इतिहासाचा अभिमानही होता. गो. नि. उर्फ अप्पा दांडेकर आणि ब. मो. उर्फ बाबासाहेब पुरंदरे यांनी इतिहासाला केंद्रस्थानी ठेवून शिवकालात प्रसिध्द असलेल्या दुर्गांवर चढाई करायला सुरुवात केली. १९६२ मधे भर पावसाळयात पावनखिंडीमार्ग पन्हाळा ते विशाळगड आणि याच्याच पुढल्या वर्षी राजमाची, लोहगड, विसापुर, तुंग, तिकोना, सिंहगड, राजगड, तोरणा, लिंगाणा, रायगड अशी दहा किल्ल्यांची यात्रा या दोघांच्या पुढाकारानं यशस्वी पार पाडण्यात आली.
१९६१ साली प्रथमच मुंबईतुन ‘कुमाऊ’ रांगेतील ‘निलगिरी’ पर्वत सर करण्यासाठी मोहिम निघाली. जगदीश नानावटी यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या मोहिमेत एक मजेशीर गोष्ट घडली. हिमालयातील मोहिमेत उपयुक्त असणारे तंबु त्यावेळी मुंबईत उपलब्ध नव्हते. मग काय ? साधे कपडे शिवणाऱ्या शिंप्याला घरी बोलवुन शामियान्यासारखे तंबु शिवुन ते मोहिमेला नेण्यात आले. अर्थात ही सुरुवातीची धडपड अयशस्वी ठरली तर त्यात नवल ते कसलं!!! त्याकाळचे पर्यटन मंत्री होमी तल्यारखान यांनीही महाराष्ट्र शासनाच्या वतीनं एप्रिल १९६२ मधे हिमालयात एका पदभ्रमण मोहिमेचं आयोजन केलं. या मोहिमेत १४ डोंगरवेड्यांनी मनालीजवळच्या ‘रोहतांग पास’पर्यंत अतिउंचावरील पदभ्रमणाचा कार्यक्रम यशस्वीरित्यापुर्ण केला. प्रो. माळी हे या मोहिमेचे उपनेते होते.
एव्हाना मुंबईत ‘क्लाईबर्स क्लब’ची स्थापना झाली होती. क्लाईबर्स क्लबनं १९६२ ते ६५ या काळात श्री. वी. डी. नाडकर्णी, डॉ.अमलाडी, आदी मिस्त्री, श्री. व सौ. चारी, श्री कोठारी, यांच्या सहभागातुन देवतिब्बा, थेलुबामक, नरपर्वत या विविध मोहिमा आखल्या.
१९६६ हे वर्ष महाराष्ट्राच्या गिर्यारोहणाच्या दृष्टीनं विशेष महत्त्वाचं ठरलं. गिरिविहार या नुकत्याच स्थापन झालेल्या संस्थेतर्फे ‘हुनुमान’ शिखरावर तर ‘द क्लाईबर्स' तर्फे ‘हनुमान तिब्बा’ शिखरावर मोहिमा आखण्यात आल्या. यापैकी हनुमान हे गढ़वाल हिमालयातील अजिंक्य शिखर होतं. नंदादेवी शिखर परिसरात असलेल्या या शिखरावर चढाई करतांना प्रथम आरोहणाचा मान संस्थेनं मिळवला आणि राष्ट्रध्वजाबरोबरच हनुमानाच्या मुर्तीची स्थापनाही शिखराव करण्यात आली. प्रो. चांदेकरांच्या नेतृत्वाखालील या मोहिमेत नेत्याबरोबर दिवाणचंद अरोरा आणि दुसऱ्या टिममधे टी. वेंकटरमण, मंगेश घरत आणि प्रकाश श्रृंगारपुरे यांनी यशस्वी आरोहण केलं.
जगदीश नानवटी यांच्या नेतृत्वाखाली आखलेली हनुमान तिब्बावरची मोहिमसुध्दा इतर गिर्यारोहकांच्या सहकार्यानं यशस्वी झाली. हिमालयीन मोहिमांचे हे वर्ष महाराष्ट्राच्यादृष्टीनं यशाची पहिली चाहुल घेऊन आलं. सुनियोजित नागरी मोहिमा हिमशिखरांवर यशस्वी आरोहण करु शकतात हा एक नवा विश्वास इथल्या आरोहकांना मिळाला.
गिर्यारोहणाचे हे वारे मुंबई बाहेरदेखील मोठ्या जोमानं पसरु लागले. १९६५ मधे ‘भारत आऊटवर्ल्ड बाऊंड पायोनियर्स’ या संस्थेची पुण्यात स्थापना झाली. प्रकाश गोळे, नारायण महाजन, द.रा.गोळे या प्रभुतींनी सुदर्शन शिखराच्या परिसरातील काही शिखरांवर चढाईचा प्रयत्न केला.
पुरुषांच्या खांद्याला खांदा लावुन महिलादेखील सह्याद्रीपासुन हिमालयापर्यंत गिरिभ्रमणाच्या मोहिमा यशस्वी करु लागल्या. सांगली, कोल्हापुरपासुन मुंबई पुण्याच्या महिला हिमालयातील गिर्यारोहणाचे धडे गिरवु लागल्या. १९६६ मधेच ‘कोकथांग’ शिखरावर पुष्पा आठवलेंच्या नेतृत्वाखाली डॉ. मिना अगरवाल आणि गिरा शाम यांनी

मोहिम यशस्वी केली. १९७० मधे 'त्रिशुल  शिखरावर डॉ. मिना अगरवाल यांनी यशस्वी चढाई केली. इतकेच नव्हे तर १९७५ या आंतरराष्ट्रीय महिला वर्षामधे 'भारत आऊटवर्ड बाऊंड पायोनियर्स'नं 'जोगिन' शिखरावर महिलांची यशस्वी मोहिम आखली. तर १९७५ मधेच ललिता पाटील, विजया गद्रे यांच्या पुढाकारानं 'लेडिज माऊंटेनियरिंग क्लब'ची स्थापना झाली.

१९६६ मधे मुंबईचे रामदास प्रभु आणि हरिश शहा हे दोन तरुण गिर्यारोहक अखिल भारतीय पातळीवरच्या मोहिमेत सहभागी झाले आणि त्यांनी 'शिला' हे स्पिती हिमालयातील हिमशिखर यशस्वीरित्या सर केले. १९६९मधे रामदास प्रभुने इंडो-ब्रिटीश मोहिमेबरोबर 'बेहाली जोत' आणि 'दुपाऊं जोत' अशी दोन हिमशिखरंही सर केली. ७०चं दशक सुरु झालं ते दोन मोठ्या मोहिमांनी दोन्ही शिखरं चढाईकरिता तांत्रिकदृष्ट्या अवघड होती. यापैकी पहिली मोहिम होती गिरिविहारनं आखलेली कुमाऊं परिसरातील 'नंदाखात' या मोहिमेत शिखरावर चढाईचा प्रयत्न सुरु असतांनाच हिमकडा कोसळुन रामदास प्रभु आणि दिवाणचंद अरोरा या आघाडीच्या गिर्यारोहकांची जीवनयात्रा संपुष्टात आलो. द क्लाईंबर्सनं आयोजलेल्या गढवाल हिमालयातील 'बथर टोली' मोहिमेला देखील अशा प्रसंगाला सामोरं जावं लागलं. नितीन पटेल या मुंबईच्याच नवोदित गिर्यारोहकाचा आणि आंग कामी या अनुभवी शेर्पाचा मृत्यु या मोहिमेदरम्यान झाला. मात्र यापुर्वी प्रो. रमेश देसाई आणि हरिश कापडीया यांची तुकडी 'बथर टोली साऊथ' हे शिखर सर करण्यात यशस्वी झाली.

या दोन्ही मोहिमा संपल्या ते दुःखाचं सावट घेऊन. आपल्या मित्रांचा अपघाती मृत्यु त्यांच्या सहकाऱ्यांच्या फारच जिव्हारी लागला. मात्र गिर्यारोहणाची चळवळ अशा धक्क्यांनी थांबणारी नव्हती. त्यानंतर एखाद-दोन वर्षांपर्यंत थंडावलेल्या हिमालयातील मोहिमा पुन्हा नव्या जोमानं नव्या उत्साहानं सुरु झाल्या. डॉ. पटवर्धन आपल्या शोधक वृत्तीनं हिमालयातल्या गंगोत्री ग्लेशियरमधील कानाकोपरा शोधत निरनिराळी हिमशिखरं चढतच होते. या २०-२५ वर्षाच्या गिर्यारोहणाच्या वाटचालीकडे बघितलं की एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती या काळात गिर्यारोहण क्षेत्राला निर्णायक आणि विधायक वळण देणारी मंडळी लाभली. प्रसिध्दीमाध्यमापासुन शक्य तेवढं दूर राहत, साधनांच्या कमतरतेतील उणीव जाणवु न देता, उपलब्ध साधनांत जास्तीत जास्त चढाईचा प्रयत्न करणं शक्य तो अशा मोहिमांत तरुणांना वाव देणं आणि अर्थातच त्यांच्या प्रयत्नांना योग्य ती दिशा देणं हे काम या मंडळींनी अत्यंत यशस्वीपणे पार पाडलं.

१९७० ला जयंत नाखवा आणि केशरीनाथ पितळे यांनी मच्छिंद्रगडाच्या शिखरावर आरोहण करायचं ठरवलं. निव्वळ एका दोराच्या सहाय्यानं तीन गावकन्यांची मदत घेऊन ते मच्छिंद्रच्या माथ्यावर चढले. देहरी गावातल्या लोकांना हे सगळच इतकं अद्भुत होतं की गड उतरल्यावर लोकांनी या तरुणांची ढोल, लेझीमच्या तालावर चक्क मिरवणुकच काढली.

मात्र खऱ्या अर्थानं महाराष्ट्रातील प्रस्तरारोहणाला सुरुवात झाली ती १९७०च्या उत्तरार्धात. डिसेंबर १९७८मधे हॉलिडे हायकर्सच्या गिर्यारोहकांनी हिरा पंडीतांच्या नेतृत्वाखाली दिलीप झुंझाररावांना बरोबर घेऊन लिंगाण्यावर प्रथम यशस्वी आरोहण केलं. नोव्हेंबर १९७९ मधे हडबीच्या शेंडीवर श्रीकांत ओक, दिपक महाजन, ए.डी. गोखले आणि प्रसाद करंदीकर यांनी यशस्वी चढाई केली. इतर अनेक लहान मोठे सुळके या दरम्यान सर होऊ लागले. हे सुळके आरोहण करतांना उभ्या भिंती सामोऱ्या आल्या तर गिर्यारोहकांना कधी माघारी परतावं लागायचं. कातळकड्यावर कुठेही खाच, भेग अथवा कपार नसली तर तिथं आरोहण करणं शक्य व्हायचं नाही. अशा प्रकारच्या आरोहणासाठी आवश्यकता असते ती एक्सपान्शन बोल्ट या साधनाची. या वेळपर्यंत महाराष्ट्रामध्ये अशा चढायात एक्सपान्शन बोल्ट फारसा वापरला गेला नव्हता. तो वापरला न जाण्याचं मुख्य कारण म्हणजे त्याची अनुपलब्धता. या अडचणीवर मात करण्यात आली ती १९८३च्या मार्च महिन्यात वानरलिंगीच्या चढाईत. कमलेश सुतावणी आणि अनिल भाटीया यांनी भारतीय बनावटीचे एक्सपान्शन बोल्ट

तयार केले. मग त्या बोल्टच्या सहाय्यानं वानरलिंगीसारखा अवघड सुळका श्रीकांत ओक, चारुहास जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली, भरत हडकर, संजय बोरोले यांची तुकडी चढुन गेली.

वानरलिंगीचं हे आरोहण महाराष्ट्रातील प्रस्तरारोहणाचा महत्त्वाचा टप्पा मानला पाहिजे. कारण या चढाईनंतर महाराष्ट्रात प्रस्तरचढाईचे जणु पेवच फुटले. वेगवेगळया संस्थातले बिनीचे गिर्यारोहक अनेक अस्पर्शित कठीण सुळक्यांवर चढाई करता झगडु लागले. डिसेंबर १९८३ मधे केव्ह एक्सप्लोरर्सच्या दिलीप झुंजारराव, रमाकांत महाडिक, हिरा पंडित, अरुण सावंत, दिलिप धुमाळ यांनी माहुलीतील भटोबा उर्फ नवरा सुळक्यावरती यशस्वी आरोहण केलं.

एप्रिल १९८४ मधे नेचर्स लव्हर्स, हॉलिडे हायकर्स आणि केव्ह एक्सप्लोरर्स यांनी संयुक्तरित्या सटाणाजवळच्या तुंगी सुळक्यावर यशस्वी चढाई केली. दिलिप झुंजारराव, हिरा पंडित, अरुण सावंत, नरेन शेटीया, जगन्नाथ राऊळ हे आघाडीचे शिलेदार या मोहिमेत होते. डिसेंबर १९८४ ते मार्च १९८५ या कालावधीत झालेल्या अश्वमेध मोहिमेत नेचर लव्हर्स आणि हॉलिडे हायकर्सच्या प्रस्तरारोहकांनी माहुली परिसरातील अनेक सुळके सर केले. प्रजापती बोधणे, दिलीप झुंजारराव, उदय कोळवणकर, प्रदिप केळकर, नरेंद्र शेटीया, मणी अय्यर, जगन्नाथ राऊळ आणि मिलिंद पाठक यांचा समावेश असलेल्या ३२ जणांच्या तुकडीनं या कालावधीत लुझ बोल्डर, वझिर, करवली, नवरी, नवरीची करवली आणि आसपासचे सुळके केले. एप्रिल ८५मधे केव्ह एक्सप्लोरर्सच्या अरुण सावंत, सतिश आंबेरकर, अभिजीत पाटील यांनी लोणावळयाजवळील डुक्स नोज म्हणजेच नागफणी हा ८०० फुटी प्रस्तर कडा सर केला. डिसेंबर ८५ मधे वसंत लिमये, गिरिश संत, अनंत पे आणि जयंत कुलकर्णी या आय. आय.टी.च्या चमूनं कोकणकडा उत्तर धारेच्या मार्गानं सर केला. संपूर्ण महाराष्ट्रातील प्रस्तरारोहकांचं आकर्षण ठरलेला ७१० फुटी ‘बाण’ सुळका डिसेंबर १९८६ मधे हॉलिडे हायकर्सच्या सभासदांनी सर केला. मिलिंद पाठक, प्रजापती बोधणे, अनिल चव्हाण. डी.टी. कुलकर्णी या चढाईत सहभागी झाले होते.

प्रस्तरारोहणाची ही चढती कमान कायम राहिली आणि कोकणकड्याच्या मध्यभागातील चढाईस अत्यंत कठीण अशा ओव्हरहँगच्या मार्गानं मिलिंद पाठक, राजेश पटाडे, अनिल साबळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी यशस्वी आरोहण केलं.

मुंबईतल्या प्रस्तरारोहकांची ही धडपड सुरु असतांनाच पुण्यातल्या प्रस्तरारोहकांनी आपला मोहरा वळवला तो प्रस्तर भिंतीकडे. संजय डोईफोडे, सुरेन्द्र चव्हाण, मोरेश्वर कुलकर्णी, प्रसाद धमाळ, राजेश पटाडे, अनिल साबळे आणि त्यांचे पुणे व्हेंचरर्स आणि आरोहक या संस्थातील सहकाऱ्यांनी जानेवारी ८८ मधे ‘ऑर्थर सीट’ हा महाबळेश्वर इथला कड़ा सर केला. तर जानेवारी ९१ मधे साडे तीन हजार फुट उंचीचा ढाकोबाचा कडा सर केला. खऱ्या अर्थानं १९७८ ते १९९१ हा काळ महाराष्ट्रातील प्रस्तरारोहणाचा सुवर्णकाळ म्हणता येईल.

प्रस्तरोहणाच्या या सुवर्णकाळातच संस्थात्मक माध्यमातून मोठ्या प्रमाणावर पदभ्रमणांच्या कार्यक्रमांची सुरुवात झाली. सांगलीच्या संभाजीराव भिडे यांच्या प्रेरणेतुन स्थापन झालेल्या शिवप्रतिष्ठानने १९७७ साली पन्हाळगड ते विशाळगड या मोहिमेतुन सर्व इतिहासप्रेमींसाठी दुर्गभ्रमंतीचे दालन खुले केले. १९७८ पासनं युथ हॉस्टेलच्या पुणे शाखेद्वारे शिवदुर्गदर्शन हा दहा दिवस दहा किल्ल्यांचा कार्यक्रम सुरु झाला. १९८३ पासुन चक्रम हायकर्सनं सह्याद्रीतल्या विविध डोंगररांगांवरती ‘सह्यांकन’ हा पदभ्रमणाचा उपक्रम एक वर्षाआड आयोजित करायला सुरुवात केली. याच कालखंडात यंग झिंगारो ट्रेकर्सच्या माध्यमातुन ‘सह्यगिरि दर्शन’ या नावानं पदभ्रमणाचे कार्यक्रम आयोजित केले जाऊ लागले. १९८८ला या पदभ्रमणाच्या उपक्रमाला वेगळं परिमाण मिळालं ते नेचर लव्हर्स आणि हॉलिडे हायकर्सने आयोजित केलेल्या राजगड प्रदक्षिणेतुन. याच राजगड प्रदक्षिणेच्या थोडा काळ आधीपासुन सोमनाथ समेळांच्या पुढाकारानं दरवर्षी रायगड प्रदक्षिणेचे कार्यक्रम देखील नियमितरित्या आयोजित केले जाऊ लागले.

१९७८ ते १९८८ याच कालखंडात महाराष्ट्रातले गिर्यारोहक हिमालयात नवनवीन मोहिमा करण्यात गुंतले होते. हरिश कापडीया यांच्या नेतृत्वाखाली १९७९ साली 'कालाबलंद' ग्लेशियरमधे 'त्शिरिंग वे' या अजिंक्य शिखरावर गेलेली मोहिम यशस्वी झाली. झरक्सिस बोर्गानं या अस्पर्शित शिखरावर पहिलं पाऊल ठेवलं. त्याच मोहिमेत 'बंबाधुरा' आणि 'संगल्पा' ही दोन शिखरेदेखील सर करण्यात आली. हरिश कापडीयांच्याच नेतृत्वाखाली १९८१मधे द माऊंटेनियर्सतर्फे सुदर्शन पर्वत हे गंगोत्री परिसरातील अजिंक्य शिखर फ्रेंच आणि भारतीय गिर्यारोहकांनी एकत्रितरित्या सर केलं. जोडीलाच चतुर्भुज, सैफी, कोटेश्वर या शिखरांवर देखील चढाई करण्यात आली. १९८२ ला पुण्यात स्थापन झालेल्या 'गिरिप्रेमी' या संस्थेनं उषः प्रागे यांच्या नेतृत्वाखाली शशिकांत हिरेमठ, महावीर ठाकुर आणि बाळकृष्ण खेर यांच्या सहभागाने 'लिओपार्गियाल' ही हिमाचल प्रदेशातील सर्वोच्च शिखरावरील मोहिम यशस्वी केली.
मुंबईतील गिरिविहारच्या चमुनं संजय बोरोले आणि निता भोईरच्या नेतृत्वाखाली १९८५ला 'स्वर्गरोहिणी-२' हे अजिंक्य शिखर सर केलं. तर केव्ह एक्सप्लोअरचे रमाकांत महाडिक, दत्ता फोपे, सतिश आंबेरकर आणि संजय रांगणेकर १९८६ला 'सुलीटॉप' या कुमाऊं हिमालयातील अजिंक्य शिखरावर पोहचले. हॉलिडे हायकर्सने १९८५ मधे 'पुर्बी कामेट' ग्लेशियरमधल्या 'माना' शिखराच्या अजिंक्य उत्तर कड्यावर प्रजापति बोधणे यांच्या नेतृत्वाखाली मोहिम आखली होती. चढाईला अतिशय कठिण असा हा शिखर मार्ग मिलिंद पाठक आणि दिलिप झुंझारराव यांच्या अथक प्रयत्नानंतरही सर होऊ शकलं नाही. १९८६मधेच श्रीकांत ओक यांच्या नेतृत्वाखाली गेलेल्या गिरिविहारच्या मोहिमेतुन संजय बोरोले, अनिल कुमार यांनी भारतातलं तिसऱ्या क्रमांकाचं 'कामेट' शिखर सर केलं.
पुण्यातुन १९८६ला आणखी एक महत्वाकांक्षी मोहिम निघाली ती म्हणजे 'सतोपंथ', मिनु मेहता, नंदु पागे आणि भरत मांगरे या पुण्यातील तीन आघाडीच्या गिर्यारोहकांनी चतुरंगी परिसरातल्या या अतिशय कठिण शिखरावर चढाईचा प्रयत्न केला. मात्र दुर्दैवानं या तिघांचाही ॲव्हलांचमधे मृत्यु झाला. महाराष्ट्राच्या गिर्यारोहण क्षेत्रावर झालेला हा एक मोठा आघातच होता. या आघाताचा धक्का सहन करुन श्रीमती उषः प्रभा पागे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी पुढील वर्षी सतोपंथ परिसरात जाऊन या गिर्यारोहकांच्या मृतदेहाला योग्य ती चिरनिद्रा देण्याचे महत्त्वाचं काम पार पाडलं. उष:प्रभा पागे यांच्या या प्रयत्नात विजया गद्रे, हिरा पंडित व जगन्नाथ राऊळ सहभागी झाले होते.
एकापेक्षा एक अवघड मोहिमा पुर्ण करतांना महाराष्ट्रातल्या गिर्यारोहकांचा आत्मविश्वास वाढीला लागला होता. आता सर्वांचं लक्ष लागलं होतं ते 'सुपरक्लब' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आठ हजार मीटरवरच्या सर्वोच्च शिखरांकडे. यापैकी भारतातलं सर्वोच्च आणि जगातील तिसऱ्या क्रमांकाचं शिखर कांचनजंगाकडे महाराष्ट्रातल्या गिर्यारोहकांची नजर वळली. गिरिविहारच्या पुढाकारातुन वसंत लिमयांच्या नेतृत्वाखाली २४ गिर्यारोहकांचा चमु मार्च १९८८मधे या शिखराचं आवाहन स्विकारण्यासाठी निघाला. आठ हजार मीटरवरच्या चढाईचा महाराष्ट्रातून होणारा हा पहिलाच प्रयत्न होता. हवामानाची साथ न मिळाल्यानं चारुहास जोशी आणि उदय कोळवणकर या दोघांनाही आपले प्रयत्न शिखर माथ्यापासून अगदी थोड्या अंतरावर सोडून द्यावे लागले. दुर्देवानं या मोहिमेचे उपनेते संजय बोरोले यांचे 'हायपोथर्मिया' या विकारानं निधन झाले.
कांचनजंगा सर झाले नाही, तरी या मोहिमेतून मिळालेला अनुभव महाराष्ट्रातील गिर्यारोहकांच्या दृष्टीनं मोलाचा होता. या मोहिमेतुन प्रेरणा घेऊन यापुढच्या काळात हिमालयात तांत्रिकदृष्ट्या अवघड अस्पर्श अशा कौशल्यपुर्ण मोहिमांच्या आखणीला सुरुवात झाली.
१९९० ला पुण्याच्या दिपक कुलकर्णीच्या नेतृत्वाखाली 'भृगुपंथ' हे केदारगंगा खोऱ्यातील शिखर सर करण्यात आलं. या मोहिमेत पुण्यातील मिलिंद पोटे, मोहन पटेल यासारखे कसलेले गिर्यारोहक सहभागी झाले होते.

याचवर्षी दिव्येश मुनींनी ‘कागभुषण’ शिखरावर चढाई केली. तर प्रजापती बोधणेंच्या नेतृत्वाखाली गेलेल्या ‘मात्री’ मोहिमेत प्रसाद धमाळ यांनी शिखरावर यशस्वी पाऊल ठेवलं. १९९१ हे वर्ष सुध्दा महाराष्ट्रातल्या गिर्यारोहकांसाठी यशाची सोनेरी किनार घेऊन आलं. गंगोत्री परिसरातील योगेश्वर हे अजिंक्य शिखर रमाकांत महाडिक यांच्या तुकडीनं सर केलं. तर प्रजापति बोधणे यांच्या नेतृत्वाखाली गेलेल्या ‘पिनॅकल क्लब’च्या मोहिमेत सुरेंद्र चव्हाण, मोरेश्वर कुलकर्णी, प्रसाद धमाळ आणि अनिल साबळे यांनी ‘पनवालीद्वार’ या शिखरावर पहिली भारतीय चढाई केली. १९८६ ला झालेला आघात विसरुन पुण्याच्या गिरिप्रेमी संस्थेनं सतोपंथवर पुन्हा एकदा नव्या जोमानं चढाईची तयारी केली. प्रसाद धमाळ नेते असलेल्या या मोहिमेत सुरेंद्र चव्हाण, मोरेश्वर कुलकर्णी, अनिल साबळे, राजेश पटाडे आणि संजय डोईफोडे यांनी सतोपंथ शिखरावरील पहिली भारतीय मोहिम यशस्वी केली. याचवर्षी पुण्यातल्या ‘स्पोर्ट अॅन्ड रिसर्च फाऊंडेशन’तर्फे पहिली भारतीय नागरी एव्हरेस्ट मोहिम आखण्यात आली. अपुऱ्या निधीच्या संकटाला न जुमानता शर्थीचे प्रयत्न करुन या मोहिमेचे गिर्यारोहक साऊथ समिटपर्यंत पोचले. एव्हरेस्टचा माथा अगदी थोडक्या अंतरावर राहिला होता. पण या मोहिमेचे नेते डॉ. दिपक कुलकर्णी यांचा सहकारी रेमंड जेकबसह दुदैवी मृत्यु झाला. एव्हरेस्ट शिखर चढाईचा प्रयत्न जरी फसला तरीही आपण सर्वसामान्य नागरिक जगातल्या अत्युच्च शिखरावर मोहिम आयोजित करु शकतो हा आत्मविश्वास महाराष्ट्रातील गिर्यारोहकांना मिळाला.

१९९३ साली गिर्यारोहणाच्या क्षेत्रात एक वेगळ्याच पराक्रमाची नोंद होत होती. हृषिकेश यादव यांच्या नेतृत्वाखाली अंध गिर्यारोहकांनी मनालीजवळची ‘लडाखी’ आणि ‘शितीधार’ ही दोन शिखरं सर केली. १९९५ ला विनय हेगडे यांच्या नेतृत्वाखाली गेलेल्या मोहिमेत राजेश गाडगीळ आणि व्ही. शंकर यांनी ‘मानापर्वत-२’ या चतुरंगी ग्लेशियरमधल्या अजिंक्य शिखरावर पहिलं पदार्पण केलं. त्याच वर्षी सह्यगिरी ट्रेकर्सतर्फे झांस्कर भागातील ‘शिंगो’ खोऱ्यात एका सर्वेक्षण आणि चढाई मोहिमेचं आयोजन करण्यात आलं. मेधा बापट यांच्या नेतृत्वाखाली गेलेल्या या मोहिमेत ६२४८ मीटर उंचीचं एक अजिंक्य अनामिक शिखर सर झालं.

एकीकडे यशाची ही शिखरं गाठली जात असतांनाच दुसरीकडे लडाखमधील ‘ग्या’ शिखरावर वेगळेच नाट्य घडत होते. अनुभवी गिर्यारोहक अरुण सामंत हे गेली काही वर्ष सातत्यानं ‘ग्या’ या शिखरावर चढाईचा प्रयत्न करत होते. १९९५ सालचा त्यांचा प्रयत्न जवळजवळ यशस्वी होत आलेला होता. मात्र या शिखरावरच अतिश्रमानं अरुण सामंत यांचं निधन झालं.

हिमालयातील शिखरे एकामागुन एक सर करण्याचा हा झपाटा सुरु असतांना विनिता मुनीच्या डोक्यात मात्र वेगळीच कल्पना आली. अरुणाचल प्रदेश ते सियाचिन ग्लेशियर एवढा लांबलचक पसरलेला हा हिमालय पायी चालुन पार करायचा या अभिनव कल्पनेनं तिनं मोहिमेला सुरुवात केली. सहा महिन्याच्या अविश्रांत परिश्रमानंतर हा प्रदीर्घ ट्रेक पुर्ण करुन ती काराकोरम रांगेतील इंदिरा कोलला पोचली.

विनिताचा हा पराक्रम सुरु असतांनाच मुंबई पुण्याचे गिर्यारोहक एका वेगळ्या प्रयत्नाला लागले होते. १९९२च्या एव्हरेस्ट मोहिमेतुन मिळालेल्या धड्यामधुन यशस्वी नागरी एव्हरेस्ट मोहिम राबवायची, या निश्चयानं सर्व संस्थांची बंधनं बाजुला सारुन, सगळे नामवंत गिर्यारोहक १९९० साली स्थापन झालेल्या अखिल महाराष्ट्र गिर्यारोहण महासंघाच्या झेंड्याखाली एकत्र आले. आणि सुरुवात झाली १९९८ च्या एव्हरेस्ट मोहिमेची. हृषिकेश यादव यांच्या समर्थ नेतृत्वाखाली गेलेल्या या मोहिमेत यशाचा एक नवा अध्याय लिहिला गेला. १८ मे १९९८ ला सुरेंद्र चव्हाणनं एव्हरेस्टच्या माथ्यावर महाराष्ट्राचा भगवा ध्वज फडकवला. महाराष्ट्राच्या गिर्यारोहणाच्या इतिहासात हा दिवस निश्चितच सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल.

१९५४ पासुन सुरु झालेला गिर्यारोहणाचा हा झंझावात आता एका वेगळाच टप्प्यावर येऊन पोहचला होता. मुंबई पुण्याबाहेर देखील गिर्यारोहणाचा प्रसार वेगानं होऊ लागला होता. ८५-९०च्या आसपास नाशिक, अकोला,

कोल्हापुर, पोलादपुर, नागपुर, अमरावती, डोंबिवली अशा सारख्या अनेक ठिकाणी स्थापन झालेल्या नवनवीन संस्थांनी गिर्यारोहणात वेगवेगळया वाटा शोधायला मदत केली.
जानेवारी १९९१ मधे गिरिविराज हायकर्सच्या किरण अडफडकरांच्या नेतृत्वाखाली आजोबा कड्याची २२०० फुटाची चढाई यशस्वी करण्यात आली. याच आजोबाच्या भिंतीवरती प्रदिप केळकर आणि स्लिपर हायकर्सनी मिळुन वेगळया मार्गांनी चढाई केली होती. याच कालखंडात अरुण सावंतच्या नेतृत्वाखाली 'भिवाची काठी' करण्यात आली. १९९० ते ९५च्या कालखंडात सह्यगिरी ट्रेकर्स, पॅरामाऊंट ट्रेकर्स आणि शैलभ्रमरचे प्रस्तरारोहक माहुली परिसरात अस्पर्श राहिलेल्या चिरा, रंगभुत, शंकर, नवरा, नंदी, ब्रम्हा, माहुली बाण, वाजंत्री अशा वेगवेगळया सुळक्यांवर आरोहण करीत होते. पुण्याच्या आरोहक संस्थेच्या माध्यमातुन जानेवारी ९४मधे साल्हेरच्या शैलभिंतीवर यशस्वी आरोहण करण्यात आलं.
१९९३ पासुनच महाराष्ट्रात स्पोर्टस क्लाईबिग हा प्रकार रुजु लागला. १९९३ ला महाराष्ट्र गिर्यारोहण महासंघाच्या आयोजनाखाली पहिली प्रस्तरारोहण स्पर्धा कान्हेरी गुंफा इथं घेण्यात आली. त्यानंतर वेगवेगळया कृत्रिमी भिंतींच्या माध्यमातून हा खेळ फोफावु लागलाय. आज महाराष्ट्राचे वीर स्पोर्टस् क्लाईबिगच्या क्षेत्रात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर आपले पराक्रम दाखवित आहेत.
गिर्यारोहणातील साहसांबरोबरच गिरिजनांशी असलेली आपली बांधिलकी जपणं तितकच महत्त्वाचं असतं. राजमाची ग्रामसहाय्य योजना, दुर्गमित्र, निसर्गमित्र अशा अनेक संस्थांनी उभं केलेलं सामाजिक कार्य ह्या संदर्भात महत्त्वाचं ठरतं.
महाराष्ट्रातील गिर्यारोहण जसजसं विस्तार पावत होतं तसतसं गिर्यारोहणाशी संबंधित साहित्य देखील जन्माला येऊ लागलं होतं. अनेक सिद्धहस्त लेखकांनी आपापल्या लेखणीतुन डोंगरातला हा थरार कागदावर उमटवला आणि पहाता पहात अनोख्या डोंगर साहित्याचा एक पर्वतच उभा राहिला. १९२६ मधील स.ह. जोगळेकर लिखित 'सह्याद्री' १९४८ मधे प्रभाकर पाटणकरांनी लिहिलेलं 'हिमालयाशी झुंज' आणि 'एव्हरेस्ट दर्शन', तर श्रीकांत राय या टोपण नावानं लिहिणाऱ्या दिपक आगाशेचे १९६० चं 'गगनचुंबन' आणि 'शैलराधानाथ मोहिनी' या पुस्तकांनी मराठी साहित्याला गिर्यारोहण क्षेत्राची ओळख करून दिली. गो.नी. दांडेकरांचं 'दुर्गभ्रमाणगाथा', पुण्याचं 'सह्याद्री' मासिक, गिर्यारोहकांच बायबल समजलं जाणारं हरिश कापडिया लिखित ट्रेक दि सह्याद्री, डोंगररांगांचा निखळ आनंद देणारी आनंद पाळद्यांची 'डोंगरयात्रा', प्र. के. घाणेकरांची 'साद सह्याद्रीची भटकंती किल्ल्यांची', हॉलिडे हायकर्स निर्मित 'महाराष्ट्राची निसर्ग लेणी', यंग झिंगारो ट्रेकर्सनी पुढाकार घेऊन तयार केलेला 'सांगाती सह्याद्रीचा', हिमालयन क्लबचे दरवर्षी प्रकाशीत होणारे 'दि हिमालयीन जर्नल', वसंत लिमयांचं 'धुंद स्वच्छंद' आणि प्र. के. घाणेकरांचं 'एव्हरेस्ट राजा हिमशिखरांचा' असं कितीतरी डोंगरी साहित्य सातत्यानं लिहिलं गेलं. या साहित्यात वेगळा उल्लेख करावासा वाटतो सुनिल राज यांच्या अविश्रांत परिश्रमानं १९८२पासून सातत्यानं प्रकाशित होणाऱ्या 'जिद्द' या त्रैमासिकाचा अप्पा परबांसारख्या इतिहास तज्ञ लेखकांनं आपल्या लेखणीद्वारे या प्रकाशनाला महत्त्वाचं बळ पुरवलं.
साधारण १९५४ पासुन सुरु झालेल्या गिर्यारोहकांच्या या विविध उपक्रमांची बाह्यजगत कौतुकानं नोदं घेत होतं. गिर्यारोहकांनी पराक्रमच तसे केले होते. सह्याद्रीतील दिडशेहून अधिक सुळक्यांवर यशस्वी आरोहणे एव्हाना झाली होती. दोन-अडीचशे किल्ल्यांवर नियमितपणे भटकंती सुरु होती. हिमालयातील सर्वोच्च एव्हरेस्टलाही महाराष्ट्रातल्या गिर्यारोहकांनी गवसणी घातली होती...
हे सर्व घडत असतांनाच निरनिराळे मानसन्मान गिर्यारोहकांच्या वाट्यास येऊ लागले. महाराष्ट्र शासनातर्फे दिला जाणारा शिवछत्रपती पुरस्कार सर्वप्रथम प्रजापती बोधणे यांना गिर्यारोहणाकरता प्रदान करण्यात आला. मागोमाग दिपक कुलकर्णी, ऋषिकेश यादव, सुरेंद्र चव्हाण, राजेश पटाडे हे देखील या पुरस्काराचे मानकरी ठरले. प्रदिप

केळकरांना हा पुरस्कार महाराष्ट्रात १०० सुळक्यांच्या आरोहणाचं शतक सर्वप्रथम पुर्ण करणारा प्रस्तरारोहक म्हणून प्रदान करण्यात आला. जागतिक पातळीवर श्री. हरिश कपाडीया यांना लंडनच्या रॉयल जीओग्राफिकल सोसायटीनं संशोधकाचं सुवर्ण पदक देऊन सन्मानित केलं.

एकविसाव्या शतकातसुध्दा महाराष्ट्रातील डॉगरवेड्यांची ही वाटचाल अशाच गतीनं सुरु राहिली. २००१ला पुण्याच्या आरोहकांनी 'कात्रा कडा' सर केला. २००२ साली पुण्याच्या गिरिप्रेमींनी 'सुदर्शन पर्वत' अवघड मार्गानं सर करण्याचा मान मिळवला. या टप्यात पूर्वी सर झालेल्या कित्येक सुळक्यांवर वेगवेगळे नवीन मार्ग शोधून अधिकाधिक कठीण चढाई करण्याचे प्रयत्न होऊ लागले. याचाच परिणाम म्हणून की काय २००४ मधे बाण सुळक्यावरती शैलभ्रमर, गिरिविराज, सॅक आणि निसर्गमित्र अशा चार संस्थांनी वेगवेगळ्या मार्गांनी चढाई केली. २००४ सालीच दिव्येश मुनी, विनीता मुनी आणि श्रीपाद सपकाळ यांनी स्थिती हिमालयातील 'खांग त्शिलिंग' या अस्पर्श शिखरावर पहिले मानवी पाऊल ठेवले.

याच दरम्यान महाराष्ट्राच्या गिर्यारोहणात नवीन संकल्पनादेखील विकसित होऊ लागल्या आहेत. 'हिमालयन क्लब डॉट ऑर्ग' 'भ्रमंती डॉट कॉम', 'ट्रेक क्षितीज डॉट कॉम' ह्या इंटरनेट माध्यमातील संकेतस्थळांमधुन गिर्यारोहणाचा शास्त्रशुध्द प्रसार आणि प्रचार सुरु झालाय. लोणावळा ते भिमाशंकर, राजगड ते तोरणा अशा सह्याद्रीच्या डोंगररांगा साध्या सायकलच्या सहाय्यानं पार करून 'निसर्ग गिरिभ्रमणनं' परदेशातील माऊंटन बाईकींगची संकल्पना सह्याद्रीच्या मातीत रुजविण्याचा प्रयत्न केलाय.

आज गिर्यारोहणाची चळवळ महाराष्ट्रात महत्त्वाच्या टप्यावर येऊन पोहचली आहे. यापुढची क्षितीजं इतकीच उज्वल असतील किंबहुना याहूनही भव्य असतील या आशेनेच महाराष्ट्र पुढच्या पिढीतल्या गिर्यारोहकांकडे पाहतो आहे, त्यांचे पराक्रम न्याहळतो आहे. धन्यवाद...... ..जय हिंद जय महाराष्ट्र..

*********

संकल्पना : महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड, चौथे गिरिमित्र संमेलन

माहिती संकलन, लेखन, संपादन व सादरीकरण टिम : सुहास जोशी, राजेश गाडगीळ, हृषीकेश यादव, आनंद पाळंदे, शशी रानडे, रजनीश गोरे, चंद्रशेखर दामले, अमित जोशी, संजय जंगम.

*********